जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ ३५९४ /२०२२

**वाहतूक नियंत्रण अधिसुचना** दिनांक - ०१/०९/२०२२

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कायक्षेत्रात सध्या गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत असुन भव्य अशा गणपती विसर्जन मिरवणुका निघतात. सदर मिरवणुकीमध्ये नागरीक मोठ्या प्रमाणात भाग घेत असुन ५,७,८,९ दिवसाचे सार्वजनीक व घरगुती गणपती विसर्जनाचे मिरवणुकीकरीता नागरीक रस्त्यावर येत असल्याने गर्दी होत असते. सदर गर्दीमुळे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असलयाने वाहतुक कोंडी सोडविणेसाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>पिंपरी वाहतूक विभाग</u>**

- पिंपरी चौकातुन शगुन चौकाकडे जाण्यासाठी सर्व वाहनांना प्रवेश बंद.

पर्यायी मार्ग १ :- पिंपरी पुलावरुन उजवीकडे वळुन भाटनगर मार्गे इच्छित स्थळी जातील

पर्यायी मार्ग २ :- मोरवाडी मार्गे एम्पायर इस्टेट चे मदर टेरेसा ब्रिजवरुन काळेवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील

- काळेवाडी पुलावरुन येणारी वाहने डिलक्स चौक,कराची चौकाकडे जाण्यास सर्व वाहनांना प्रवेश बंद

पर्यायी मार्ग :- काळेवाडी पुलावरुन उजवी कडे वळुन जमतानी चौक व गेलार्ड चौकाकडे महात्मा फुले कॉलेज, डेअरी फार्म मार्गे मुंबई-पुणे हायवे मार्गे इच्छित स्थळी जातील.

- पिंपरी चौकातुन गोकुळ हॉटेलकडे जाण्यासाठी सर्व वाहनांना प्रवेश बंद.

पर्यायी मार्ग :- पिंपरी चौकाकडुन पिंपरी सर्व्हिस रोडने क्रोमा शोरुम समोरुन इच्छित स्थळी जातील.

तरी पिंपरी वाहतुक विभागाचे हद्दीत गणपती विर्सजन व मिरवणुक असल्याने **दि.४/९/२०२२ , ६/९/२०२२, ८/९/२०२२ व दि.९/९/२०२२ रोजी १६.०० ते २४.०० वा पर्यंत** वरील प्रमाणे वाहतुक वळविण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

**<u>हिंजवडी वाहतूक विभाग</u>**

१.टाटा टी जंक्शन चौक- टाटा टी जंक्शन चौकाकडुन जॉमेट्रीक सर्कल चौकाकडे वाहतुक जाण्यास प्रवेश बंद.

- पर्यायी मार्ग- टाटा टी जंक्शन चौकाकडुन जॉमेट्रीक सर्कल चौकाकडे जाणारी वाहतुक लक्ष्मी चौकाकडुन इच्छित स्थळी जातील.

२.जॉमेट्रीक सर्कल चौक- जॉमेट्रीक सर्कल चौकाकडुन मेझ्झा व शिवाजी चौकाकडे जाणारी वाहतुक बंद.

- पर्यायी मार्ग- जॉमेट्रीक सर्कल चौकाकडुन मेझ्झा व शिवाजी चौकाकडे जाणारी वाहतुक टाटा टी जंक्शन चौकाकडे जावुन लक्ष्मी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

३.मेझ्झा ९ चौक -मेझ्झा ९ चौकाडुन शिवाजी चौकाकडे वाहतुक जाण्यास बंदी

- पर्यायी मार्ग- -मेझ्झा ९ चौकाडुन शिवाजी चौकाकडे जाणारी वाहतुक लक्ष्मी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

४.शिवाजी चौक- शिवाजी चौकाकडुन जाभुंळकर जीम,वाकडनाका, हिंजवडी गावठाण कडे वाहने जाण्यास बंदी.

- पर्यायी मार्ग- - शिवाजी चौकाकडुन जाभुंळकर जीम, इंडियन ऑईल चौक, हिंजवडी गावठाण कडे जाणारी वाहतुक विप्रो सर्कल फेज ०१ चौक, जॉमेट्रीक, टाटा टी जंक्शन चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

५.कस्तुरी चौक-कस्तुरी चौकाकडुन शिवाजी चौक हिंजवडीकडे वाहने जाण्यास बंदी.

- पर्यायी मार्ग- - कस्तुरी चौकाकडुन शिवाजी चौक हिंजवडीकडे जाणारी वाहतुक विनोदे वस्ती कॉर्नर, लक्ष्मी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

६.जांभुळकर जीम चौक- शिवाजी चौक व ताडीवाला रोड कडे वाहने जाण्यास बंदी.

- पर्यायी मार्ग- शिवाजी चौक व ताडीवाला रोडकडे जाणारी वाहने इंडियन ऑईल चौक, कस्तुरीचौक पुढे विनोदे वस्ती कॉर्नर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

७.इंडियन ऑईल चौक- जांभुळकर जीम चौक व शिवाजी चौकाकडे वाहने जाण्यास बंदी.

- पर्यायी मार्ग- जांभुळकर जीम चौक व शिवाजी चौकाकडे जाणारी वाहने कस्तुरीचौक पुढे विनोदे वस्ती कॉर्नर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

तरी हिंजवडी वाहतुक विभागाचे हद्दीत **दिनांक ०९/०९/२०२२ रोजी गणपती विर्सजन मिरवणुक असल्याने १६.०० ते २४.०० वा पर्यंत** वरील प्रमाणे वाहतुक वळविण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

**सही/-**

**(आनंद भोईटे)**

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून सदरची बातमी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी, पिंपरी, हिंजवडी वाहतुक विभाग

४) कार्यकारी अभियंता, सबंधीत प्रभाग, पिंपरी चिंचवड

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.